सकाळ TODAY
पुणे, शुक्रवार, २७ मे २०१६

मधली सुटी

# माझे कॉलेज जीवन



मी उच्च माध्यमिक शिक्षणासाठी स.प. महाविद्यालयात प्रवेश घेतला. प्राचार्य दिलीप सेठ, अष्टेकर सर व कला शाखेच्या मुख्याध्यापिका डॉ. नीलिमा गुंडी यांच्या सहकार्यामुळेच माझ्या कॉलेज जीवनाला सुरवात झाली, असं म्हणायला हरकत नाही. सुरवातीला आई-वडिलांना माझी काळजी वाटत होती. हिला वर्ग सापडतील का, मुलं-मुली त्रास तर देणार नाहीत ना, असे अनेक प्रश्न त्यांना पडत होते. परंतु ही काळजी थोड्याच दिवसांत मिटली. कारण माझे सर्व शिक्षक आणि मित्र-मैत्रिणींनी मला समजून घेतलं. कॉलेजमध्ये असतानाच मी पोहण्याच्या एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेची तयारी करत होते, त्याचबरोबर समुद्रात पोहण्याच्या स्पर्धेचा सरावही सुरू होता. सकाळी व संध्याकाळच्या वेळेत सराव चालायचा, त्यामुळे मला सर्व तासांना उपस्थित राहणं शक्य होत नव्हतं. या काळात मला नोट्स देणं, तसंच इतर कार्यालयीन गोष्टींची माहिती पुरविण्यासाठी मैत्रिणी सहकार्य करत. कॉलेजचे प्राचार्य व शिक्षकही माझा नाच, पोहणं व अभ्यासाबाबत आपुलकीनं चौकशी करत. बारावीनंतर पदवीसाठी मी येथेच प्रवेश घेतला. या काळात कॉलेजनं गॅदरिंगमध्ये दिलेली नृत्याची संधी कायमस्वरूपी माझ्या स्मरणात राहील. मी स.प. महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे, असं म्हणवून घेण्यात मला नेहमीच अभिमान वाटतो. आता मी कला शाखेच्या तृतीय वर्षाची परीक्षा दिली आहे. या सर्व वाटचालीत कॉलेजमधील सर्वांचं सहकार्य फार मोलाचं ठरलं. मी या सर्वांच्या प्रेमाची जन्मभर ऋणी राहीन. **(समाप्त)**

**- गौरी गाडगीळ**

**(सोमवारपासून गायक प्रथमेश लघाटे)**

## संक्षिप्त क्रीडावृत्त

## स. प. च्या मानसिंग निगडेची नाबाद अर्धशतकी खेळी निर्णायक

पुणे, ता. २६ : वसंतदादा सेवा संस्थेच्या वतीने राजीव गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्ताने आयोजितसद्भावना करंडक टी-८ क्रिकेट स्पर्धेत मानसिंग निगडेने केलेल्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर स. प. महाविद्यालयाने क्रिकेट मास्टर्स अकादमीचा (सीएमए) नऊ गडी राखून पराभव केला. नेहरू स्टेडियमच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत क्रिकेट मास्टर्स अकादमीने (सीएमए) प्रथम फलंदाजी करताना चार बाद ७१ धावा केल्या. या वेळी मानसिंग निगडेने दोन गडी बाद केले. त्यानंतर स. प. महाविद्यालयाने सात षटकांत १ बाद ७५ धावा केल्या. या वेळी मानसिंग निगडेने केवळ २७ चेंडूत नाबाद ५७ धावा केल्या. अन्य लढतीत रॉयल क्रिकेट अकादमी सीनिअर संघाने शिरूर स्पोर्टस क्लबचा ४७ धावांनी, डेस्टार्ड ईगल्स क्लबने रॉयल क्रिकेट अकादमी ज्युनिअर संघाचा दहा धावांनी, क्लब ऑफ महाराष्ट्र 'अ' क्लबने हडपसर जिमखाना संघाचा ४१ धावांनी, तर ओम क्रिकेट क्लबने प्रशांत वाहिले क्रिकेट अकादमीचा दहा गडी राखून पराभव केला. या स्पर्धेतील 'सामन्याचा मानकरी' हा मान मानसिंग निगडे (स. प. महाविद्यालय), रविराज पाटील (रॉयल क्रिकेट अकादमी, सीनिअर), राहुल गायकवाड (डेस्टार्ड ईगल्स क्लब), अतुल विटकर (क्लब ऑफ महाराष्ट्र 'अ'), मयूर मैद (ओम क्रिकेट क्लब) यांनी मिळविला.